# महिला व बाल विकास विभाग.

## उद्दिष्टे

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत**

1. ६ वर्षा खालील लहान मुलांच्या आरोग्य आणि पोषणचा दर्जा वृध्दीगंत करणे
2. लहान मुलांच्या सुयोग्य संतुलित मानसिक, शाररिक आणि सामाजिक विकासाचा पाया तयार करणे.
3. लहान मुलांमधील बाल मुत्यूचे प्रमाण कमी करणे, कुपोषण आणि शाळा बाह्यतेला प्रतिबंध करणे.
4. राज्यातील मुलांच्या विकासाच्या उद्देशाने विविध शासकीय उपक्रम आणियोजना राबविणाऱ्या विविध शासकीय विभागामध्ये धोरण सुनिश्चिती आणि अंमलबजावणी करण्याकरिता समन्वय साधणे.
5. राज्यातील लहान मुलांच्या मातांना आरोग्य आणि पोषण मुल्यांची माहिती आणि प्रशिक्षण देणे जेणे करून मुलांचे संगोपन करण्याच्या त्यांच्या क्षमतावृध्दीगंत होतील.
6. लहान मुलांच्या मातांना आणि गर्भवती महिलांना देखील पौष्टिक आहार पुरविणे.

## कार्ये

**योजनेतंर्गत लाभार्थींना पुरविण्यात येणाऱ्या 6 प्रमुख सेवा:**

1. पुरक पोषण आहार – पुरक पोषण आहार 6 महिने ते 6 वर्षे मुले, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता यांना अंगणवाडी घरपोच पोषण आहार व गरम ताजा आहार दिला जातो.
2. लसीकरण – या सेवेमध्ये अंगणवाडी मध्ये 0 ते 6 वर्षे वयोगटातील मुले , गरोदर माता, स्तनदा माता यांना आरोग्य विभागामार्फत अंगणवाडी केंद्रात दिल्या जातात.
3. आरोग्य तपासणी – या सेवेमध्ये अंगणवाडी मध्ये 0 ते 6 वर्षे वयोगटातील मुले , गरोदर माता, स्तनदा माता यांच्या 4 तपासण्या एकात्मिक बाल विकास सेवायोजना व आरोग्य विभागाच्या समन्वयाने अंगणवाडी केंद्रात केल्या  जातात.
4. संदर्भ आरोग्य सेवा – या सेंवेमध्ये तीव्र कमी वजनाची बालके, आजारी बालके, गरोदर व स्तनदा माता, या गरजेप्रमाणे उपचारार्थ जवळच्या उपकेंद्रात , प्राथमिक आरोग्य केंद्रात,ग्रामीण रुग्णालयात पाठवुन संदर्भ सेवा पुरविली जाते.
5. पूर्व शालेय शिक्षण – या सेवेत 3 ते 6 वर्षे वयोगटातील बालकांना अंगणवाडी केंद्रामध्ये भौतिक , सामाजिक व बौध्दीक विकास साधण्याचे दृष्टीने तसेच शालेय शिक्षणात गोडी निर्माण करण्याच्या दृष्टीने पुर्व शालेय शिक्षण देण्यात येते. यासाठी आकार अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे.
6. पोषण आणि आरोग्य शिक्षण –  या सेवेत 15 ते 45 वर्षे वयोगटातील किशोरीमुली, स्त्रियाना बालकांचा विकास साधण्याचे दृष्टीने पोषण आहार व आरोग्य विषयी आरोग्य   शिक्षण देण्यात येते.